State Board of Secondary & Higher Secondary Education, Divisional Board, Osmanpura, Station Road, Chhatrapati Sambhajinagar-431005.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ, उस्मानपुरा, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००५

Email : chair.aurboard@mahedu.gov.in / sschscboardabad@gmail.com

Tel : Div.Chairman (P):(0240)-2331116, EPABX -2334228/2334284, Fax:2321201, Div. Secretary(P):2341035

जा.क्र.छ.सं.वि.मं./स्वीस/२०२६-२७/ 2943
दिनांक : 20 / 8 /२०२६

प्रती,

सन्माननीय सर्व मुख्याध्यापक
बंधु आणि भगिनी, शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये(राज्यमंडळ)
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर.

सर्वांना स्नेहपुर्वक नमस्कार !

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत येणाऱ्या राज्य मंडळाच्या सर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक यांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी मन:पुर्वक शुभेच्छा.

मित्रहो, यापूर्वी मी छत्रपती संभाजीनगर विभागाचा विभागीय शिक्षण उपसंचालक म्हणुन कार्यरत असतांना आणि आता विभागीय मंडळाचा अध्यक्ष म्हणुन काम करत असतांना अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापन या शिक्षण प्रक्रीये मधील महत्वाच्या घटकांसदर्भात ज्या बाबी निदर्शनास आल्या किंवा येत आहेत त्या अनुषंगाने आपल्याशी काही महत्वाच्या मुद्यांवर संवाद साधण्याची इच्छा होती. त्याबाबी खालील प्रमाणे:-

१. जेव्हढे विद्यार्थी ११ वी ऑनलाईन मधुन प्रवेशित झालेले आहेत आणि इयत्ता १२वी साठी शिउसं, संचालनालय यांनी ऑनलाईन बदली करण्यास परवानगी दिलेले आहेत त्यापेक्षा एक जरी विद्यार्थी जास्त असला तर त्याचे वार्षिक परिक्षेला आवेदनपत्र भरले जाणार नाही, व संबंधित विद्यार्थी परीक्षेपासुन वंचित राहिला/ राहिले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची आणि शाळा/ महाविद्यालयांची राहील.

२. ज्या शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये त्यांच्या मंडळ मान्यता कालबाह्य झाल्या असतील व त्यांनी मंडळ मान्यता वर्धित केल्या नसतील त्यांना यावर्षी आवेदनपत्रे भरता येणार नाहीत. ऑनलाईन आवेदन पत्रे भरतांना वर्धित मंडळ मान्यतेची अधिकृत प्रत अपलोड केल्या नंतरच शाळा/ महाविद्यालयाचे लॉगिन करता येईल. त्यामुळे ज्यांच्या मंडळ मान्यता वर्धित करावयाच्या बाकी राहिल्या असतील त्यांनी तात्काळ B.E.O./ E.O. त्यांच्या तपासणी अहवालासह प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे मार्फत सादर करावे. वर्धित मंडळ मान्यते करिता शिक्षणाधिकारी किंवा विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या शिफारशीची आवश्यकता नाही, याची नोंद घ्यावी.

३. फेब्रु/ मार्च २०२७ परीक्षेसाठी राज्य मंडळाने असा निर्णय घेतला आहे की, विलंब, अतिविलंब शुल्कासह जास्तीत जास्त ३० नोव्हेंबर पर्यंन्तच विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रे भरुन घ्यायची आहेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये त्यानंतर सवलती दिल्या जाणार नाही. याचा फायदा असा होणार आहे की, कोणत्या केंद्रावर किती परीक्षार्थी प्रविष्ट होणार आहेत हे चित्र किमान २ ते २ ½ महिने आधीच स्पष्ट होईल व ऐनवेळी परीक्षार्थी वाढले तरी होणारी गैरसोय टळेल. जी शाळा/ महाविद्यालये जाणिवपूर्वक उशिरात उशिरा आवेदनपत्रे भरतात त्यांनी ही बाब लक्षात घ्यावी.

४. ज्या शाळा/ महाविद्यालयांना ज्या ज्या विषयांची मान्यता आहे त्यांनी त्याच विषयांची आवेदनपत्रे भरणे अपेक्षित आहे. मंडळाची मान्यता न घेता ज्या विषयांना विद्यार्थी बसविले जातील त्या विषयांचे मुल्यमापन केले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. विद्यार्थी परीक्षेपासुन वंचित राहिले/ नापास झाले तर मंडळ जबाबदार असणार नाही.

यावर्षी आमच्या असे निदर्शनास आले की १९६ उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयांनी क्रॉप सायंन्स, कंप्युटर सायंन्स आणि इलेक्ट्रॉनिक्स या विषयांची मान्यता नसतांना विद्यार्थी परीक्षेला बसविले, आम्ही यावर्षी त्यांचा निकाल जाहीर केलेला आहे. मात्र संबंधित शाळा/महाविद्यालयांना ०२-०२ नोटीस पाठवुनही खुलासा न करणे, विषय मान्यता असल्याचे पत्र सादर न करणे, मंडळाच्या नोटीसला उत्तर न देणे वगैरे गोष्टींमुळे आम्ही काही कनिष्ठ महाविद्यालयांची मंडळ मान्यता गोठविली आहे. आगामी परीक्षा संदर्भाने सुरु होणारी परीक्षा आवेदनपत्रे त्यांना भरता येणार नाहीत.

उपरोक्त ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात दंड भरला व विषय मान्यतेसाठी/ परिपुर्ण प्रस्ताव दाखल करुन मान्यता घेतली त्यांची मंडळ मान्यता पुर्नजिवित करुन दिली जाईल. मात्र जेव्हढा विलंब होणार तेव्हढे विलंब शुल्क संबंधित शाळा/ महाविद्यालयांना भरावे लागणार याची नोंद घ्यावी.

५. **प्रॅक्टीकल, स्पोर्टस, इंटरर्नल ॲसेसमेंट मार्क्स:-**

गेल्या वर्षापासुन प्रॅक्टीकल, स्पोर्टस आणि अंतर्गत मुल्यमापनाचे गुण हे मंडळाच्या विशिष्ट लिंक वर/ साईटवर ऑनलाईन भरावे लागतात. त्यासाठीचा कालावधी आधीच निश्चित करुन तो परिपत्रकाच्या माध्यमातुन वेळोवेळी सर्वांना कळविला जातो. मात्र असे निदर्शनास आले आहे की सदर कालावधीची मुदत संपण्यासाठी थोडे/काही दिवस शिल्लक राहतात तरी देखिल ८००-१००० शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी हे गुण ऑनलाईन भरलेले नसतात. मंडळामार्फत या शाळा/ महाविद्यालयांना वारंवार संपर्क करुन हे गुण भरण्याबाबत आवाहन करण्यात येते. **(खरे म्हणजे असे संपर्क करुन आवाहन करण्याची वेळ का यावी, शाळा/ महाविद्यालयांची ही जबाबदारी नाही का? त्यांना आपल्या शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थींची काळजी का नाही** ?)

याउपरही मुदत संपल्यानंतर साधारण १५०-२०० शाळा/ महाविद्यालये यांनी माहिती भरलेली नसते. काही शाळांना तर निकाल लागल्या नंतर जेव्हा मुले नापास होतात अथवा कमी गुण मिळतात तेव्हा त्यांना जाग येते. मग एखाद्या शिपायाला, क्लर्कच्या जवळ ते मंडळाकडे जाऊन विनंती करण्याची जबाबदारी सोपवतात.

परीक्षामध्ये केलेल्या मुल्यमापनाचे गुण भरण्याएवढया महत्वाच्या कामासाठी मुख्याध्यापकांना वेळ नाही तर मग त्यांना कोणत्या कामासाठी वेळ आहे असा प्रश्न पडतो. विशेष म्हणजे क्लर्क, प्रयोगशाळा सहाय्यक ही पदे फक्त वेतन घेण्यासाठीच भरलेली आहेत का? ते लोक ही कामे का करत नाही ? याचा विचार मु.अ. यांनी गांभीर्याने करावा.

६. **प्रॅक्टीकल , अंतर्गत गुण देणे**

असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश शाळा/ महाविद्यालयाचे विज्ञान व अन्य विषयांच्या प्रात्यक्षिक परिक्षांना विद्यार्थ्यांना ३० पैकी ३० व अन्य विषयांच्या अंतर्गत मुल्यमापनासाठी २० पैकी २० गुण सर्रास खैराती सारखे वाटले जात आहे. हुशार मुलांनासुद्धा पैकीच्या पैकी व सर्वसाधारण मुलांना सुद्धा पैकीच्या पैकी गुण दिले जात आहे . त्यामुळे हुशार व सर्वसाधारण मुलांमध्ये फरक केला जात नसुन हुशार मुलांवर कोठेतरी अन्याय होत आहे.

काही महाभाग शाळा/ महाविद्यालये तर मुले प्रात्यक्षिक परीक्षेला अनुपस्थित असुन देखिल निकाल लागल्या नंतर मंडळाकडे येऊन नजरचुकीने मार्क द्यायचे राहुन गेले अशी खोटी व दिशाभुल करणारी माहीती देऊन विद्यार्थ्यांचे नसलेले गुण वाढवुन देयाची गळ घालताना दिसतात.

विशेष म्हणजे शाळा भेटी दरम्यान जेव्हा प्रयोगशाळांना भेटी दिल्या जातात तेव्हा अनेक शाळांकडे प्रयोगशाळा नसणे, प्रयोगशाळा असलीच तर ती कार्यान्वित नसणे, महिनो महिने वापरात नसणे, साहित्यावर धुळ जमा झालेली असणे, साहित्य, रसायने अनेक वर्षांपुर्वी EXPIRE/ OUTDATED झालेली असणे, वर्षानुवर्ष साहित्य खरेदी केलेले नसणे, प्रयोगच घेतले जात नसणे, मुलांना साहित्य हाताळायला न देणे अशा अनेक बाबी निदर्शनास येतात आणि तरीसुद्धा अशा शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये मुलांना प्रात्यक्षिक परीक्षेमध्ये पैकीच्या पैकी गुण देतात.

आता इथुन पुढे हे खपवून घेतले जाणार नाही. अभ्यासक्रमा मध्ये नमुद असलेले प्रयोग झाले पाहिजेत, विज्ञान विषयाच्या शिक्षकांनी पाठ्य पुस्तकामधील प्रयोगांच्या गरजेनुरुप साहित्याची यादी करुन मुख्याध्यापकाकडे द्यावी. मुख्याध्यापक यांनी ती ते स्वता: किंवा संस्थेकडुन प्राप्त करवून घ्यावे व सर्व प्रयोग मुलांना समजेपर्यंन्त त्यांचे डेमो घ्यावेत म्हणजे भविष्यात मुलांनी विज्ञान शाखेची निवड केल्यास त्यांना अडचणी उद्भवणार नाहीत.

आणि इथुन पुढे प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण भरतांना विद्यार्थ्यांना प्रयोगवह्या, टयुटोरिअल्स ठेवले आहेत किंवा नाही याची खातर जमा केली जाईल.

शिवाय इतर विषयांच्या ८०-२० च्या फॉर्म्युल्यानुसार अंतर्गत २० गुणांपैकी गुणदान करतांना विद्यार्थ्यांची ७५ टक्के किमान उपस्थिती, दोन्ही टर्म मधील ०२ युनिट टेस्ट चे तपासलेले पेपर त्यामध्ये त्यांना मिळालेले गुण, सहा माही परीक्षा , सराव परीक्षा मधील तपासलेले पेपर व त्यामध्ये मुलांना मिळालेले गुण, तोंडी परीक्षांसाठी विषय निहाय प्रश्नपेढ्या (QUESTION BANK), तोंडी परीक्षांचे वेळापत्रक, मुलांचे उपस्थितीचे रेकॉर्डस इत्यादी सर्व बाबी बघुनच अंतर्गत मुल्यमापनाचे गुण ग्राह्य धरण्यात येईल.

७. ज्या कायद्याने शाळेतील कर्मचाऱ्यांच्या सेवांचे नियमन होते तो "महाराष्ट्र खाजगी शाळा (सेवेच्या शर्ती) अधिनियम १९७७ आणि नियमावली १९८१ मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी अभ्यासली पाहिजे. " राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची " वैशिष्ट्ये समजावुन घेतली पाहिजे. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा(NCF) आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा(SFS) हा भारतातील व राज्यातील शालेय शिक्षणाची दिशा, अभ्यासक्रम, अध्यापन पध्दती आणि मुल्यमापन ठरवणारा मुख्य मार्गदर्शक दस्तावेज आहे, त्यातील बारकावे समजुन घेतले पाहिजे. बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम (RTE) वाचला पाहिजे व एकुणच शालेय शिक्षण विभागाकडुन विविध विषयांवर निर्गमित झालेले आणि होणारे शासन निर्णय, परिपत्रके, पत्रे यांचे संकलन (विषयनिहाय) S.O. files तयार केल्या पाहिजेत व त्या कार्यालयामध्ये संग्रही ठेउन वा संगणकावर फोल्डर तयार करुन आवश्यकते प्रमाणे उपयोगात आणले पाहिजे. सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या मंडळाचा अधिनियम आणि नियमावली(महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम- १९६५ आणि नियमावली, शिक्षासूची इत्यादी अभ्यासणे गरजेचे आहे.

८. **मुल्यमापन:-**

- शिक्षण प्रक्रियेचे अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापन हे अविभाज्य घटक आहेत, इयत्ता ९वी पर्यंतचे आणि ११वी वर्गाचे मूल्यमापन हे शाळा/ महाविद्यालय स्तरावर होत असते. तथापि, इयत्ता १० वी आणि १२ वी वर्गाचे वार्षिक परीक्षेचे मूल्यमापन हे शिक्षण मंडळा मार्फत होत असते. अर्थात, शिक्षण मंडळाकडे स्वत:चा असा शिक्षक वर्ग मूल्यमापन करण्यासाठी नसतो. विभागातील शाळा/ महाविद्यालयांमधील विविध विषयांना अध्यापन करणाऱ्या अनुभवी शिक्षकांकडूनच ते केले जाते. या शिक्षकांमधुनच परीक्षक, नियामक, आणि मुख्यनियामक यांची नियुक्ती करुन पेपर तपासून घेतले जातात.

- मात्र असे निदर्शनास आले आहे की, सदरचे मुल्यमापन करण्यास बहुतांशी शिक्षक तयार नसतात. मुल्यमापनाचे काम टाळण्याचा ते प्रयत्न करतात. साधारण पणे २००-३०० पेपरचे मूल्यमापन एका शिक्षकाला करायचे असते व हे विहीत वेळेत तपासून द्यायचे असतात, कारण निकाल वेळेत लावायचा असतो. एक जरी विभाग निकाल तयार करण्यात मागे पडला तरी राज्याचा निकाल लागु शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. मात्र आपल्या विभागातील शिक्षक मुल्यमापन करायला/ पेपर तपासायला नाखुश असतात. त्यांनी पोस्टाद्वारे प्राप्त गठ्ठे न स्विकारल्या मुळे मंडळा मध्ये सदरील गठ्ठे परत येतात व त्यांचे ढिग लागतात. स्वत: आजारी आहे, बायको/नवरा आजारी आहे अश्या थातुर- मातुर सबबी सांगतात.
- दुसरे असे की, जे लोक मूल्यमापन करतात ते पुरेशा गांभीर्याने करत नाहीत. स्वत: पेपर तपासतात की नाही याची शंका येते की, झोपेत पेपर तपासतात हा प्रश्न पडावा एव्हढया चुका करुन ठेवतात. जेव्हा निकाल लागतो तेव्हा आणि ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षे एव्हढे गुण मिळत नाहीत ते विद्यार्थी पुनर्तपासणी साठी उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (विहीत शुल्क भरुन) मागणी करतात व सदरील उत्तरपत्रिका त्रयस्थ शिक्षकांकडून तपासुन घेतात तेव्हा अनेक ठिकाणी देय असलेले गुण दिले नसल्याचे लक्षात येते. आणि मग ०३ सदस्य असलेल्या नियामकांच्या समिती कडून त्यांची पडताळणी केली असता ८ ते १० अशा रेंज मध्ये मार्क कमी/ जास्त होतात. काही काही पेपर मध्ये तर २०-२० मार्क वाढल्याचे निदर्शनास आले आहे. अशा मुल्यमापनामुळे हुशार विद्यार्थ्यांचे नुकसान होते. त्यांच्या मानसिक स्थितीवर विपरीत परिणाम होतो. मंडळाच्या कार्यपध्दतीवर विनाकारण प्रश्न चिन्ह निर्माण होते. शिवाय या प्रक्रीयेमध्ये मंडळाचा १ ते १ ½ महिना वाया जातो.
- असे होऊ नये म्हणुन ज्या शिक्षकांना पेपर तपासायला आले आहेत त्यांना आपण वेळीच कार्यमुक्त केले पाहिजे. त्यांना पेपर तपासायला भाग पाडले, पाहिजे निर्दोष मूल्यमापन होण्यासाठी गुणदान पध्दती नीट समजुन घेणे बाबत काहि महत्वाच्या विषय शिक्षकांना मुख्य नियामक, नियामक यांच्या मदतीने प्रशिक्षण देण्याचा मानस आहे. याबाबत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, संस्था पदाधिकारी यांचे सहकार्य अपेक्षित आहे.

९. कॉपी केस मध्ये अडकलेल्या चौकशी दरम्यान काही विद्यार्थ्यांची निवेदने वाचनात आली, उत्तरपत्रिका बघायला मिळाल्या. इयत्ता १०वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांना दोन वाक्ये धड लिहीता येत नाहीत. त्यांच्या पेक्षा इतर शाळांतील दुसरी, तिसरी मधिल मुले चांगले लिहितात. शाळा भेटी मध्ये आम्ही बघतो की मुलांना धड वाचताही येत नाही. मग जे विद्यार्थी आपल्याकडे इयत्ता ५वी पासुन १०वी पर्यंन्त किंवा १२ वी पर्यंन्त शिकतात आणि त्यांच्या बाबत आपण, श्रवण, भाषण, वाचन, लेखन या अगदीच मूलभूत क्षमता सुद्धा पुर्ण करुन घेत नसु तर आपण मुख्याध्यापक म्हणुन, शिक्षक म्हणुन काय काम करत आहोत? आपण रोज समाजामध्ये शेखी मिरवुन घेतो की आम्ही समाज घडवितो, पिढया घडवितो, या अशा पिढया जर आपण घडवत असु तर या विद्यार्थ्यांना पुढे काय भविष्य आहे? ते बेकारीमध्ये वाढ करणार/ होणार आणि समाजाचे स्वास्थ बिघडविणार...

तेव्हा जागे व्हा, शाळेतील शिक्षकांच्या एकत्रित बैठका घ्या , त्यांना या बाबी समजावुन सांगा- मुलांना वाचन यावे यासाठी उपक्रम राबवा, शुद्धलेखन/गृह पाठ कंम्पल्सरी करा, लेखनाचा सराव मिळण्यासाठी ५-५, १०-१० सराव परीक्षा घ्या. शिक्षक काय काम करतात याचे प्रभावी संनियंत्रण करा. कामचुकार शिक्षकांवर संस्थेकडे कारवाई प्रस्तावित करा. परंतु मुलांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण द्या.

१०. **गुणवत्ता पूर्ण शिक्षण:-**

जेव्हा जेव्हा शाळा तपासणी केली जाते किंवा मंडळामधील उत्तरपत्रिकांचे अवलोकन केले जाते तेव्हा असे समजते की, मुलांना दोन वाक्ये धड बोलता येत नाही, लिहिता येत नाही. पर्सनल रिस्पॉन्स बाबत च्या प्रश्नांची, क्रीटीकल थिंकींग बाबतच्या प्रश्नांची उत्तरे धड लिहीता येत नाही. इंग्रजी भाषेबाबत तर फार भयावह परिस्थिती आहे. शिक्षकांनाच इंग्रजीमधुन शिकविता येत नसल्याचे अनेक ठिकाणी निदर्शनास येत आहे. ते केवळ पाठयपुस्तकामधील धडे कवितांचे भाषांतर करतात. केवळ ते वाक्य वाचुन दाखवितात व त्याचा मराठी मध्ये अर्थ मुलांना सांगतात.

ट्रान्सलेशन मेथड आउटडेटेड झालेली आहे.डायरेक्ट मेथड सद्या वापरात असुनही शिक्षक फॉलो करत नाहीत. ग्रामर स्वतंत्रपणे शिकविणे कालबाह्य झालेले आहे तरी ते पारंपारीक पध्दतीने शिकविणे चालु आहे. डायरेक्ट मेथड वापरत नाहीत. बहुतांशी शिक्षकांना त्या त्या विषयाचे वर्गनिहाय लर्निंग आउटकम(अध्ययन निष्पत्ती) साध्य करण्यासाठी कोणकोणते अध्ययन अनुभव (लर्निंग एक्सपिरीएन्सेस्) द्यायचे ते त्यांना माहित नाही. त्यांनी पाठ्यपुस्तकालाच साध्य मानले आहे. प्रत्येक टेक्स्ट बुक मध्ये शिक्षकांसाठी सूचना आहेत ते त्यांचे अनुपालन करीत नाहीत. अनेक एज्युकेशन ॲप्लीकेशन, वेबसाईट त्यांना माहित नाही, कन्टेंन्ट रिलेटेड व्हिडीओज मुलांना दाखवत नाहीत. कोणतेही शै. साहित्य वापरत नाहित. खडू-फळा या पारंपारीक साधनांमध्येच अडकून पडलेले आहेत. स्मार्ट क्लासरुम नाही.

बहुतांश शिक्षक टेक्नोसॅव्ही नाहीत. युटयुब वरील अनेक विषयांच्या कन्टेंन्ट रिलेटेड व्हिडीओज चा वापर मुलांकरीता करत नाहीत. परिणामी विद्यार्थ्यांना त्या त्या वर्गातील क्षमता प्राप्त होत नाहीत व ते वरच्या वर्गामध्ये जात आहेत. आपला अभ्यासक्रम हा क्रमन्वित (प्रोग्रेसिव्ह) पध्दतीचा असल्यामुळे खालच्या वर्गामध्ये सिलॅबस आहे तो त्यांना नीट समजला नाही, त्या त्या वर्गाच्या क्षमता प्राप्त झाल्या नाहीत तर त्यांना वरच्या वर्गामध्ये अध्ययन करतांना अडथळे निर्माण होत आहेत.

मग ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक हायस्कुलच्या शिक्षकांना दोष देतात, हायस्कुलचे प्राथमिक शिक्षकांना दोष देतात हे असे वर्षानुवर्षे चालु आहे. मात्र मुख्याध्यापक यांनी सर्व संबंधितांना एकत्रित बसवुन नेमका प्रॉब्लम कुठे येत आहे यावर चर्चा घडवून आणणे, ज्या लेव्हलवर उणिवा राहुन जात आहेत त्या ठिकाणी काम करवून घेणे आवश्यक आहे. मात्र असे होताना दिसत नाही. हे फक्त इंग्रजी विषयापुरतेच मर्यादित नसुन जवळपास सर्वच विषयांच्या बाबतीत कमी-अधिक प्रमाणात असे घडत आहे.

११. मित्रहो मुख्याध्यापक हा शाळेचा कणा असतो, कर्णधार असतो. त्याने घेतलेले चांगले/ वाईट निर्णय हे शाळेचे भवितव्य ठरवत असतात. अत्यंत महत्वाच्या अशा पदावर आपली नियुक्ती झाली आहे. समाजात आणि शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्या मनामध्ये आपल्या विषयी फार मोठा आदर आहे. पालकांनी मोठया विश्वासाने त्यांच्या मुलांचा हात आपल्या हाती दिला आहे. मुलांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळावे, मुलांचे वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये करीअर घडावे याबाबत ते रोज स्वप्न बघतात आणि ते आपल्या व आपल्या शिक्षकांच्या माध्यमातुन पूर्ण होईल, अशी आशा बाळगून असतात. पालक रात्रं दिवस शेतीमध्ये राबतात, मोलमजुरी करतात. पोटाला चिमटा घेऊन मुलांना शिकवितात त्यांच्या विश्वासाला तडा जाणार नाही, याची काळजी आम्ही व आपण घेतली पाहिजे. अन्यथा सेवानिवृत्त होताना किंवा सेवा निवृत्त झाल्यावर आमच्या व आपल्या मनात खंत/ अपराधीपणाची जाणिव (guilt) राहील की, एव्हढया चांगल्या पदावर काम करत होतो आणि कित्येक मुलांचे कल्याण करु शकलो असतो पण मी दुर्लक्ष केले.

असे होऊ नये म्हणुन आपण माझ्यासाठी एव्हढे कराल अशी अपेक्षा आहे. कराल ना ?

**(अनिल साबळे)**
**विभागीय अध्यक्ष,**
**विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर**

प्रत माहितीसाठी सविनय सादर:-

१. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
२. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य मंडळ पुणे.
३. मा. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचनालय, महाराष्ट्र राज्य पुणे.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
२. संचालक, आंग्ल भाषा, छत्रपती संभाजीनगर.
३. डाएट प्राचार्य(सर्व) छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), (प्राथमिक), (योजना) , छत्रपती संभाजीनगर विभाग.